९

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६**

- उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक)(ग) अन्वये अधिसूचना.
- बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली -२०३४ मधील प्रस्तावित फेरबदलाचे मंजूरीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई :४०० ०३२,**
**क्रमांक. टिपीबी-४३२३/प्र.क्र.५०/२०२३/नवि-११**
**दिनांक :- ३ डिसेंबर, २०२४**

**शासन निर्णय :** सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( प्रतिभा भदाणे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत -:**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
६. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८. मा.प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति,**

(१) मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
(२) मा.प्रधान सचिव , महिला व बालकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
(३) मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
(४) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई, इन्साहटमेंट, महापालिका मार्ग, मुंबई- ४००००१.
(५) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे असाधारण राजपत्रात भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती १) नगर विकास विभाग नवि-११), मंत्रालय, मुंबई २) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई ३) मुख्य कार्यकारी अधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प, झो.पु. प्राधिकरण, वांद्रे, मुंबई-५१ ४) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व ५) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना पाठविण्यात याव्यात.)
(६) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९, यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.
(७) निवड नस्ती (नवि-११).

**Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.**

Sanction to add new Provisions for Hirkani Kaksha i.e. Ladies Room in Regulation 31 and Regulation 37 of Development Control and Promotion Regulations-2034 for Greater Mumbai under section 37(2) of the said Act.

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department,**
Mantralaya, Mumbai 400 032.
Dated: - 3rd December, 2024

**NOTIFICATION**

**No.TPB-4323/CR-50/2023/UD-11**

Whereas, the Brihanmumbai Municipal Corporation is the Planning Authority for the area within its jurisdiction (hereinafter referred to as "the said Corporation") as per the provision of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act");

Whereas, in exercise of the powers conferred by sub Section (1) of Section 31 of the said Act, the State Government vide Notification No. TPB-4317/629/CR-118/2017/DP/UD-11, Dt. 08/05/2018 (hereinafter referred to as "the said Notification") has accorded sanction to the Draft Development Plan-2034 of Greater Mumbai along with the Development Control and Promotion Regulations -2034 for Greater Mumbai (hereinafter referred to as "the said Regulations") with modifications shown in SCHEDULE-A appended to the said Notification excluding the substantial modifications as shown in SCHEDULE-B appended to the said Notification. And whereas, Government has issued corrigendum of even number dt. 22nd June, 2018; And whereas, thereafter Government has issued a Corrigendum and Addendum of even number dt. 29th June, 2018 to the said Notification, which is published in Government Gazette dt. 30th June, 2018; And whereas, the said Regulations have come into force from 1/09/2018; And whereas, the Government of Maharashtra vide Notification dt. 21/09/2018 has sanctioned EP-1 to EP-168 (Excluding certain EP and provisions which were kept in abeyance) in the said Regulation; And whereas, the Government of Maharashtra vide Notification dt. 12/11/2018 has issued corrigendum in respect of some typographical errors and mistakes and also to clarify and co-relate certain provisions of said Regulations for its proper interpretation;

And whereas, the State Government in women and child development department has been directed to propose Ladies Room (Hirkani Kaksha) in the premises of Public, Semi- Public, Institutional, Educational and other similar buildings where women's work to a large extent;

And whereas, it has been observed by the Government that there is no separate ladies room for lactating women, pregnant women, mothers of new born children and children under 06 years of age in buildings, where women's work to a large extent;

And Whereas, the Government is of the opinion, it is necessary to include a new provision in the said Regulation to make it mandatory to provide services of Ladies Room

नगर विकास विभाग, सत्यमेव जयते, मंत्रालय, मुंबई - 32.

in buildings used for the public, semi-public, institutional, educational and other similar purpose on the occasion of International Women's Day:

And whereas, in exercise of the powers conferred under Sub-Section (1AA) of Section 37 of the said Act, Government had issued Notice of even no. dated 23$^{rd}$ May, 2023 for inviting suggestions/objections from the general public with regard to the proposed modification as mentioned in the Schedule appended to the said Notice (hereinafter referred to as "the proposed modification") and appointed the Deputy Director of Town Planning, Gr. Mumbai as the Officer (hereinafter referred to as "the said Officer") to complete the procedure as stipulated under Section 37(1AA) of the said Act and to submit a Report on the objections / suggestions received in respect of the proposed modification to the Government after giving hearing to the concerned persons;

And whereas, the said Notice dated 23$^{rd}$ May, 2023 was published in the Maharashtra Government Gazette (Extra-ordinary Part-I, Konkan Division Supplement) dated 13$^{th}$ June, 2023 and the said Officer has submitted his report vide letter dated 27/12/2023 through the Director of Town Planning, Maharashtra State, after completing the legal procedure stipulated under Section 37(1AA) of the said Act;

And whereas, after considering the Report of the said Officer and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, the Government is of the opinion that the proposed modification is required to be sanctioned;

Now, therefore, in exercise of the powers conferred upon it under section 37(1AA) (c) of the said Act, the Government hereby:-

A) Sanctions the proposed modification as described more specifically in the Schedule appended herewith.
B) Fixes the date of publication of this Notification in the Official Gazette as the date of coming into force of this modification.
C) Directs the said Corporation that in the Schedule of Modifications sanctioning the said DCPR-2034, after the last entry, the Schedule referred to at (A) above shall be added.

This Notification shall also be published on the Government website- www.maharashtra.gov.in (Acts/ Rules)

**By order and in the name of the Governor of Maharashtra.**

नगर विकास विभाग
सत्यमेव जयते
मंत्रालय, मुंबई - ३२

**(Pratibha Bhadane)**
**Joint Secretary to Government**

# SCHEDULE

**Accompaniment to the Government in Urban Development Department Notification No. TPB- 4323/C.R.50 /2023/UD-11, dated:- 3rd December, 2024.**

## Sanctioned Modification

**The following New provision no. (xxxxi) in Clause (I) of Regulation 31 and New provision No.34 in Regulation 37 of Development Control and Promotion Regulations -2034 for Greater Mumbai is added as given in table below : -**

| Regulation. | Existing Provision | Sanctioned Provision |
|---|---|---|
| **Regulation No.31(1):- New Sub Clause (xxxxi) is added.** | --- | **New Provision (xxxxi):- Hirkani Kaksha (Ladies Room)** as specified in Regulation 37(34). |
| **Regulation No. 37:- New Sub Clause (34) is added.** | --- | **New Provision (34):- Hirkani Kaksha (Ladies Room)** - In any Public / Semi Public, Institutional, Educational, Commercial, Assembly, Mercantile, Business and Office building area up to 25 sqm. may be allowed for the use of ladies with their children under the age of 6 years, Pregnant women and new born child mother.<br>**Note : -**<br>1. Hirkani Kaksha (Ladies Room) is a facility at a work place / public place where pregnant women, lactating mothers can rest and breastfeed the baby in this room.<br>2. It shall be accessible from common passage / staircase / lift etc., and shall be located preferably at ground or first floor,or in case if the ground/upper floor are used as stilt / podium / parking floors, then the floor next above the said parking floor / floors.<br>3. Ladies toilet shall be provided with appropriate ventilation, lighting and drainage facilities.<br>4. For this purpose, all necessary infrastructures should be provided in the room.<br>5. It shall not be counted in FSI.<br>6. The ownership shall vest with the society / association of owners if any. |

नगर विकास विभाग,
सत्यमेव जयते
मंत्रालय, मुंबई-३२

**(Pratibha Bhadane)**
**Joint Secretary to Government**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६**
बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली -२०३४ मध्ये हिरकणी कक्ष (महिला कक्ष) साठी विनियम ३१ आणि विनियम ३७ मध्ये नविन तरतुद अंतर्भूत करण्यसंदर्भातील फ़ेरबदलास उक्त अधिनियमाचे कलम (२)३७अन्वये मंजूरीबाबत .

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई :४०० ०३२.**
**दिनांक :- ३ डिसेंबर, २०२४**

## अधिसूचना

**क्र. टिपीबी-४३२३/प्र.क्र.५०/२०२३/नवि-११**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करणेत आलेला आहे.) च्या तरतुदींनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका त्यांचे अधिकार क्षेत्राकरीता (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त महानगरपालिका" असा करणेत आलेला आहे.) नियोजन प्राधिकरण आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१, पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन राज्य शासनाने अधिसूचना क्र.टिपीबी-४३१७/६२९/प्र.क्र.११८/२०१७/वि.यो./नवि-११, दि.८/०५/२०१८ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करणेत आलेला आहे) द्वारे बृहन्मुंबई प्रारुप विकास योजना-२०३४ सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ (यापुढे याचा उल्लेख "उक्त नियमावली" असा करणेत आलेला आहे) ला उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेले सारभूत स्वरुपाचे फेरबदल (ई.पी.) वगळून उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-अे मध्ये दर्शविलेल्या सुधारणेसह मंजूरी दिली आहे. आणि ज्याअर्थी शासनाने उक्त अधिसूचनेस सम क्रमांकाचे शुध्दीपत्रक दि.२२ जून २०१८ रोजी निर्गमित केले आहे; आणि ज्याअर्थी, त्यानंतर उक्त अधिसूचनेस शासनाने समक्रमांकाचे शुध्दीपत्रक व पुरकपत्र दि. २९ जून, २०१८ रोजी पारित केले असून सदर शुध्दीपत्रक व पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ३० जून, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे; आणि ज्याअर्थी, उक्त नियमावली दि.१/०९/२०१८ पासून अंमलात आली आहे; आणि ज्याअर्थी, शासनाने दि. २१/०९/२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे उक्त नियमावलीमधील सारभूत स्वरुपाचे बदल ईपी-१ ते ईपी-१६८ ला (ठराविक ईपी व निर्णयार्थ प्रलंबित ठेवलेल्या ठराविक तरतुदी वगळून) मंजूरी प्रदान केली आहे; आणि ज्याअर्थी, उक्त मंजूरीच्या अधिसूचनेत आणि मंजूर तरतूदीमध्ये टंकलेखनाच्या त्रुटी व चुका तसेच उक्त नियमावलीमधील काही तरतूदींच्या अर्थबोधाची स्पष्टता करुन सुसंगती आणणे या करिता शासनाने दि.१२/११/२०१८ रोजी शुध्दीपत्रक निर्गमित केले आहे;

आणि ज्याअर्थी, सार्वजनिक, निमसार्वजनिक, संस्थात्मक, शैक्षणिक व तत्सम इतर वापराच्या इमारती ज्या ठिकाणी महिला मोठया प्रमाणात काम करतात अशा इमारतींमध्ये "महिला कक्ष" (Ladies Room) प्रस्तावित करणेबाबत शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या वतीने हिरकणी कक्षाची स्थापना करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत;

आणि ज्याअर्थी या ठिकाणी महिला मोठया प्रमाणात काम करतात अशा इमारतींमध्ये स्तनपान करण्याऱ्या स्त्रिया, गरोदर महिला, नवजात बालकांच्या माता व ०६ वर्षाखालील मुले व माता यांच्याकरीता

नगर विकास विभाग

स्वतंत्र महिला कक्ष (Ladies Room) नसल्यामुळे महिलांना अडचणी निर्माण होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ च्या पोट कलम (१कक) अन्वये प्राप्त अधिकार आणि त्या संदर्भातील सर्व शक्तींचा वापर करुन, शासनाने दि. २३ मे २०२३ रोजीची सूचना त्यासोबतचे परिशिष्टामध्ये नमूद प्रस्तावित फेरबदलावर (यापुढे ज्यांचा उल्लेख "प्रस्तावित फेरबदल" असा करण्यात आला आहे.) जनतेकडून हरकती / सूचना मागविण्यासाठी प्रसिदध केली आहे आणि ज्याद्वारे प्रस्तावित फेरबदलाबाबत प्राप्त होणाऱ्या हरकती / सूचनांवर संबंधितांना सुनावणी देण्याकरीता तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१कक) अन्वये विहित केलेली कार्यवाही पूर्ण करुन प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी उपसंचालक नगर रचना, बृहन्मुंबई यांची अधिकारी (यापुढे ज्यांचा उल्लेख "उक्त अधिकारी" असा करण्यात आला आहे.) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित फेरबदलाची सदर शासन सूचना दि. २३ मे २०२३ ही महाराष्ट्र शासन राजपत्र (असाधारण भाग-१ कोकण विभागीय पुरवणी) मध्ये दि. १३ जुन २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती आणि उक्त अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम ३७(१कक) अन्वये वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन दि. २७/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये त्यांचा अहवाल नगर रचना संचालनालयामार्फत शासनाचे अंतिम मंजूरीसाठी सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी उक्त महानगरपालिकेची विनंती विचारात घेऊन व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पूणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर प्रस्तावित फ़ेरबदल मंजूर करणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झालेले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१कक)(ग) अन्वये प्राप्त अधिकारात आणि त्या संदर्भातील सर्व शक्तींचा वापर करुन शासन याद्वारे :

अ) उक्त प्रस्तावित फेरबदलाचे प्रस्तावास सोबतचे परिशिष्टामध्ये नमूद केलेप्रमाणे मंजूरी देत आहे.

ब) सदरची अधिसूचना शासकीय राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेचा दिनांक हा उक्त फेरबदल अंमलात आलेचा दिनांक असेल.

क) उक्त महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ च्या मंजूरी सोबतच्या फेरबदलाचे परिशिष्टामध्ये शेवटच्या नोंदीनंतर खालील परिशिष्ट समाविष्ट करणेचे निर्देश देत आहे.

सदर अधिसूचना महाराष्ट्रशासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदा / नियम ) या वेबसाइटवर देखील प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - 32.

( प्रतिभा भदाणे )
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

# परिशिष्ट

(शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीबी-४३२३/प्र.क्र.५०/२०२३/नवि-११, दिनांक:- ३ डिसेंबर, २०२४ सोबत वाचावयाचे परिशिष्ट.)

## मंजुर फेरबदल

**The following New provision no. (xxxxi) in Clause (I) of Regulation 31 and New provision No.34 in Regulation 37 of Development Control and Promotion Regulations -2034 for Greater Mumbai is added as given in table below : -**

| Regulation. | Existing Provision | Sanctioned Provision |
|---|---|---|
| **Regulation No.31(1):- New Sub Clause (xxxxi) is added.** | --- | **New Provision (xxxxi):- Hirkani Kaksha (Ladies Room)** as specified in Regulation 37(34). |
| **Regulation No. 37:- New Sub Clause (34) is added.** | --- | **New Provision (34):- Hirkani Kaksha (Ladies Room)** - In any Public / Semi Public, Institutional, Educational, Commercial, Assembly, Mercantile, Business and Office building area up to 25 sqm. may be allowed for the use of ladies with their children under the age of 6 years, Pregnant women and new born child mother.<br>**Note : -**<br>1. Hirkani Kaksha (Ladies Room) is a facility at a work place / public place where pregnant women, lactating mothers can rest and breastfeed the baby in this room.<br>2. It shall be accessible from common passage / staircase / lift etc., and shall be located preferably at ground or first floor,or in case if the ground/upper floor are used as stilt / podium / parking floors, then the floor next above the said parking floor / floors.<br>3. Ladies toilet shall be provided with appropriate ventilation, lighting and drainage facilities.<br>4. For this purpose, all necessary infrastructures should be provided in the room.<br>5. It shall not be counted in FSI.<br>6. The ownership shall vest with the society / association of owners if any. |

( प्रतिभा भदाणे )

सह सचिव, महाराष्ट्र शासन